## निशाणी क्र.६८ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र.४ यांना खालीलप्रमाणे जवळचे व कायदेशीर वारस असून सदर वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे आहे.

वादी क्र.४- दिनकर काशिनाथ कोळी (मयत वारस)

४ अ) नवनाथ दिनकर कोळी,
वय-४२ वर्षे, धंदा-शेती,
रा.भाळवणी, ता.खानापूर, जि.सांगली.

४ ब) सविता संभाजी भोर,
वय-४० वर्षे, धंदा-शेती व गृहिणी,
रा.कुंभारी, ता.जत, जि.सांगली.

४ क) माया रमेश कोळी,
वय-३५ वर्षे, धंदा-शेती व गृहिणी,
रा.हिवतड, ता.आटपाडी, जि.सांगली.

४ ड) राजश्री विकास झुंजार,
वय-३२ वर्षे, धंदा-शेती व गृहिणी,
रा.त्रीमली, ता.खटाव, जि.सातारा.

सदरील वारस अभिलेखावर घेणेची विनंती वादी यांनी केली आहे.

(३) प्रतिवादीतर्फे नि.क्र.६८ वरील अर्जावरच म्हणणे सादर केले आहे

की, वादीचा अर्ज मान्य व कबूल नाही. वादीने जाणूनबुजून वारस रेकॉर्डवर आणणेकरीता विलंब केला आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

(४) निशाणी क्र.६८ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र फे.नि.क्र.७२ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे सदर मयत वादी क्र.४ यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. तरी दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादींनी दाखल केलेली निशाणी क्र.६६ वरील वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होणेसाठी केलेला अर्ज मंजूर करणेत आलेला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता नैसर्गीक न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

(१) वादी यांचा निशाणी क्र.६८ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.12.15 18:16:44 +0530

विटा.
दिनांकः- ०८.१२.२०२५.

(श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt.V.D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 08.12.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 12.12.2025 |
| Order uploaded on | :- | 15.12.2025 |